नव्या वर्षात  मन की बातच्या  माध्यमातून आणखी प्रेरणादायी प्रयत्न सामायिक करण्याचं वचन देत, प्रधानमंत्र्यांनी सर्वांना नव्या वर्षाच्या शुभेच्छाही दिल्या.

**<><><><><>**

प्रधानमंत्र्यांच्या आजच्या मन की बात कार्यक्रमाचं थेट प्रसारण आज ठिकठिकाणी करण्यात आलं. भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी एकत्र येऊन हा कार्यक्रम पाहिला. मुंबईत चांदिवली इथं भाजपा जनसंपर्क कार्यालयातही कार्यक्रमाचं प्रसारण झालं. यावेळी भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हा कार्यक्रम पाहिला. भाजपा आमदार प्रसाद लाड यांच्या शीव कार्यालयातही मन की बातचं प्रसारण करण्यात आलं. यावेळी लाड यांच्यासह कार्यकर्ते आणि पदाधिकारीही उपस्थित होते.

रत्नागिरीत मुरुगवाडा इथे मन की बातचं प्रसारण करण्यात आलं. मुरुगवाडा ग्रामस्थांनी उपस्थित राहून हा कार्यक्रम ऐकला. सांगलीतही मन की बात या कार्यक्रमाचं सामूहिक श्रवण करण्यात आलं. या कार्यक्रमामुळे फायदा होत असल्याचं डॉक्टर रोहिणी तुकदेव  यांनी सांगितलं.

**<><><><><>**

वर्षअखेरच्या कालावधीत प्रचंड गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन मध्य रेल्वेने निवडक प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरते निर्बंध घातले आहेत. प्लॅटफॉर्मवर होणाऱ्या गर्दीचे व्यवस्थापन आणि स्थानक परिसरात

त्यानंतर दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी उतरलेल्या ऑस्ट्रेलियाचे फलंदाज ठराविक अंतरानं बाद होत गेले. मात्र आधी सातव्या गड्यासाठी अर्धशतकवीर लबूशेन आणि कमीन्स यांनी ५७ धावांची, तर दहाव्या गड्यासाठी नॅथन लायन आणि बोलँड यांनी नाबाद ५५ धावांची भागिदारी करत ऑस्ट्रेलियाला पुन्हा चांगल्या स्थितीत आणलं.

दुसऱ्या डावात बुमराहने ४ तर सिराज यानं ३ गडी बाद केले.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर तालुक्यातल्या भटुंबरे इथं आज सकाळी भाविकांची बस आणि ट्रकचा अपघात होऊन दोघांचा मृत्यू झाला तर २५ जण जखमी झाले. मृतांमध्ये एक वृद्ध महिलेचा आणि एका सात वर्षांच्या मुलीचा समावेश आहे. ही बस पुण्याहून पंढरपूरच्या दिशेने जात होती. या अपघातातल्या जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावर वावेदिवाळी गावच्या हद्दीत काल भरधाव कारने दिलेल्या धडकेत दुचाकीचालकाचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी माणगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला असून, कारचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

**<><><><><>**

